# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

**४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.**

☏ : २५६५६२३४ Email : ropune.dte@gmail.com Web : ropune.org.in


जा.क्र : तंशिविकापु/विवि/प्रवेश/२०१९/ २४३० दिनांक : २२-०६-२०१९

प्रति,
प्राचार्य / संचालक
या विभागीय कार्यालयाचे अंतर्गत सर्व पदवी अभ्यासक्रमाची
सुविधा केंद्र

विषय : शैक्षणिक वर्ष २०१९-२० मधील प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी सुविधा केंद्र (FC) सुरु करण्याबाबत

संदर्भ — १. मा आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष यांचे दिनांक २१/०६/२०१९ रोजीचे कार्यालयीन आदेश.
२. मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय म रा मुंबई यांचे पत्र क्रमांक २अ/एडीएम/२०१९ दिनांक २२/०६/२०१९

शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये प्रथम वर्ष अभियांत्रिकी /तंत्रशास्त्र/औषधनिर्माणशास्त्र/फार्म डी /वास्तुशास्त्र/ हॉटेल मॅनेजमेंट ॲन्ड केटरींग टेक्नॉलॉजी या पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य यांनी सदर्भाधीन कार्यालयीन आदेश क्रमांक १ व्दारे सुविधा केंद्राची यादी, सुविधा केंद्रांच्या कर्तव्ये व जबाबदा-या आणि आवश्यक सोयी सुविधा याबाबत सुचना निर्गमित केल्या आहेत, सदर आदेश व सुचना या कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात आलेल्या आहेत.

उपरोक्त संदर्भ क्र २ च्या पत्रान्वये मा संचालक यांनी दिलेल्या निर्देशानुसार आपणास कळविण्यात येते की कोणत्याही परस्थितीत आपल्या संस्थेचे **सुविधा केंद्र आजच्या आज सुरु करावे. तसेच सुविधा केंद्र मध्ये विद्यार्थी व पालक यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता देखील आपण घ्यावी.**

**आपणास कळविण्यात येते की उद्यापासून (दिनांक २३/०६/२०१९ पासून) प्रवेश प्रक्रीयेचे काम पूर्ण होईपर्यत आपल्या संस्थेचे सुविधा केंद्र सुटटीच्या दिवशी देखील सुरु ठेवावे.**

प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे.